**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – इश्वर दयाराम राऊत

वय – ६२ वर्ष, व्यवसाय – शेती

राहणार – गांगनेर, ता.मौदा, जि. नागपूर

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एम. भिवगडे यांच्यातर्फे</u>**

१. दि. ०८.०१.२०१७ रोजी पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. पोलिसांनी माझ्या समक्ष कोणतीही पंचनाम्याची कार्यवाही केली नव्हती व काहीही जप्त केले नव्हते. आता मला समन्स दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माहित नाही. पोलीसांनी माझी सही पोलीस स्टेशनला घेतली होती. सहीस **निशाणी क्र.३४** देण्यात येते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीस **निशाणी क्र.३५** देण्यात येते. आता मला जप्तीपत्रक दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीस **निशाणी क्र.३६** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८.०१.२०१७ रोजी पोलिसांनी मला वार्ड नं.१, बौद्ध नगर, गांगनेर येथे पंचनाम्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, मला वाचून दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३.०१.२०१७ रोजी पोलीसांनी मला वार्ड नं.१, बौद्ध नगर, गांगनेर येथे जप्ती पंचनाम्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष एक बासाची पोकळ काठी जप्त केली, माझ्या समक्ष जप्तीपत्रक तयार केले, मला वाचून दाखविले व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

नि.फौ.ख.क्र.१३४/२०१७



सरकार वि. रॉबी वगैरे

निशाणी क्र. ३३

**उलटतपास आरोपींतर्फे श्रीमती गेडाम वकील यांच्या तर्फे**

नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2025.01.29 17:41:38 +0530

ठिकाण –कामठी

**(रा.र. शेरेकर)**

दिनांक –२९/०१/२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.